पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.
क प्रभाग समिती सभा
कार्यपत्रिका क्रमांक- २१
स भा वृ त्तां त

दिनांक ०६/२/२०१९ वेळ-सकाळी ११.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा. "क" प्रभाग समिती मासिक सभा बुधवार दि.६/२/२०१९ रोजी सकाळी ११.४५ वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.लोंढे नम्रता योगेश — सभापती
२) मा.अश्विनी संतोष जाधव
३) मा.सारीका शिवाजी सस्ते
४) मा.वसंत प्रभाकर बोराटे
५) मा.लांडगे सारीका संतोष
६) मा.लांडगे राजेंद्र किसनराव
७) मा.सागर सुखदेव हिंगणे — स्विकृत सदस्य

याशिवाय मा.अण्णा बोदडे- क्षेत्रीय अधिकारी, श्री.कुंभार एम.व्ही. - प्रशासन अधिकारी, मा.संजय घुबे- कार्यकारी अभियंता स्थापत्य,मा.नितीन देशमुख- कार्यकारी अभियंता, विदयुत मा.संजय भोसले- कार्यकारी अभियंता जलनिस्सारण, मा.जाधव – उपअभियंता उदयान, मा. शशीकांत दवंडे- उपअभियंता पापु मा.वायकर- उपअभियंता स्थापत्य, मा.बाळु लांडे – उपअभियंता विदयुत मा.बी.बी.कांबळे-सहा.आरोग्याधिकारी,श्री.एस.व्ही.कांबळे-लघुलेखक,श्री.दवाळे, - आरोग्य निरीक्षक,श्री.भोसले- - कनिष्ठ अभियंता विदयुत,श्री.देसले-कनिष्ठ अभियंता पापु , श्री.कोंढरे- अतिक्रमण निरीक्षक हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य/सदस्या, अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक- ३) प्रभाग क्रमांक २ मध्ये अस्तित्वातील मोडकळीस आलेली सार्वजनिक स्वच्छतागृह पाडून त्याठिकाणी नवीन स्त्री व पुरुषांसाठी सुलभ स्वच्छतागृह बांधणेबाबत-मा.सौ.सारीका नितीन बो-हाडे, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ४) प्रभाग क्रमांक २ बो-हाडेवाडी येथील गट नं.५४४ मध्ये नव्याने आलेल्या प्राथमिक शाळेस कै.महादु श्रीपती सस्ते मुले / मुले शाळा क्र.१३ असे नामकरण करणेबाबत- मा.सौ.सारीका नितीन बो-हाडे, मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक -३६ विषय क्रमांक- १
दिनांक- ६/२/२०१९ विभाग-
सुचक- मा.वसंत बोराटे अनुमोदक-मा.सारीका सस्ते
संदर्भ- मा.वसंत बोराटे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २ बो-हाडेवाडी मधील गट नं.१६७ /१६८ ते गट नं.१६९ ( जुना १२८७ ते जुना गट नं.१२८८ ) मधुन नवीन १२ मी.रस्ता प्रस्तावित करणे आवश्यक आहे. तरी या गट नंबर मधुन कलम २०५ अन्वये रस्ता घोषीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक -३७ विषय क्रमांक- २
दिनांक- ६/२/२०१९ विभाग-
सुचक- मा.नम्रता लोंढे अनुमोदक-मा.सारीका सस्ते
संदर्भ- मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग क्र.०८ इंद्रायणीनगर येथील प्राधिकरण हद्यीतील सेक्टर नं.४ व ६ च्या मधील ट्रॅफीक पार्क समोरील रस्त्यास **"पै.कै.महादू धोंडीबा बनकर"** असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक -३८ विषय क्रमांक- ३
दिनांक- ६/२/२०१९ विभाग-
सुचक- मा.सारीका सस्ते अनुमोदक-मा.नम्रता लोंढे
संदर्भ- मा.सारीका सस्ते,मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २ मधील खालीलप्रमाणे सार्वजनि क शौचालयांच्या इमारती मोडकळीस आलेली आहेत.

१) संत सावतामाळी मंदिरा समोर २) संत सावतामाळी मंदिरा पाठीमागे तळई गार्डन ३) इंद्रायणी वजन काटयासमोर कुदळवाडी बी.आर.टी.रोड लगत ४) रोकडेवस्ती चिखली गावठाण ५) स्मशानभूमी चिखली गावठाण

सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस् ऑर्गनायझेशन ही एक प्रतिथयश अशी अशासकीय सामाजिक संस्था स्वच्छतागृह बांधुन त्यांची देखभाल करण्यात अग्रेसर आहे व त्यांच्या कार्यानुभवामुळे या संस्थेकडुन म.न.पा. परिसरात अनेक "सुलभ स्वच्छतागृहे" बांधुन "पैसे द्या व वापरा" या तत्वावर वापरात आहेत.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन संस्थेमार्फत बांधकाम पूर्ण झाल्यानंतर करारनामा केल्याप्रमाणे स्वच्छतागृहाचे व्यवस्थापन व देखभाल दुरुस्ती पुढील ३०

वर्षासाठी संस्थेमार्फत करण्यात येते व यासाठी प्रस्तुत संस्थेचा पुर्वानुभव चांगला आहे.त्यामुळे वरील पाच ठिकाणी नवीन स्त्री व पुरुषांसाठी सुलभ स्वच्छतागृह बांधणेसाठी मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन संस्थेला दिल्यास नागरीकांची सोय होणार आहे.

तरी वरीलप्रमाणे जुनी व मोडकळीस आलेली सार्वजनिक शौचालय पाडून त्याठिकाणी नवीन स्त्री व पुरुषांसाठी स्वच्छतागृह मे.सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन मार्फत बांधणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -३९ विषय क्रमांक- ४
दिनांक- ६/२/२०१९ विभाग-
सुचक- मा.सारीका सस्ते अनुमोदक-मा.नम्रता लोंढे
संदर्भ- मा.सारीका सस्ते,मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.२ बो-हाडेवाडी येथील गट नं.५४४ मध्ये नव्याने झालेल्या प्राथमिक शाळेस **"कै.महादु श्रीपती सस्ते मुले /मुली शाळा क्रमांक १३"** असे नामकरण करणेत यावे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

सही/-
(**सौ.नम्रता योगेश लोंढे** )
सभापती
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क्र-कक्षेका/सभा/कावि/८४/२०१९.
दिनांक २२ /२/२०१९

सही/-
**प्र. प्रशासन अधिकारी**
**तथा सचिव सभाशाखा**
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत-सर्व संबंधित विभाग

---------------------------